मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ‘रेड झोन’च्या मोजणीत 5 हजार घरांना दिलासा

## क्रीडा समितीचे माजी सभापती उत्तम केंदळे यांचा विश्वास : ‘टेन्टेटिव्ह रेड झोन लाईन’ 157 मीटरने कमी होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

‘रेड झोन’मुळे यमुनानगर आणि कृष्णानगरमधील ८० टक्के भाग प्रभावित आहे. २०१९ मध्ये टेन्टेटिव्ह लाईन घोषित केली होती. आता रितसर मोजणी आणि सर्व्हेक्षण झाल्यास या भागातील सुमारे ५ हजार घरे रेडझोनच्या हद्दीबाहेर होतील. तसेच, रेड झोनची हद्द तात्काळ प्रभावाने १५७ मीटर कमी होईल, असा विश्वास पिंपरी-चिंचवड महापालिका क्रीडा समितीचे माजी सभापती उत्तम केंदळे यांनी व्यक्त केला.

पिंपरी-चिंचवडमधील बहुप्रतिक्षित ‘रेड झोन’ चा प्रश्न कायमस्वरुपी सोडवण्यासाठी २०१४ पासून भाजपा अमादार महेश लांडगे पाठपुरावा करीत आहेत. संरक्षण विभागाने नुकतीच रेड झोनच्या मोजणीसाठी ‘एनओसी’ दिली आहे. ही प्रक्रिया ‘रेड झोन मुक्त पिंपरी-चिंचवड’ च्या दृष्टीने पहिले पाऊल मानले जात आहे.

उत्तम केंदळे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे तत्कालीन अध्यक्ष सदाशिव खाडे आणि आमदार महेश लांडगे यांच्या सहकार्याने रेड झोनची हद्द मोजून द्यावी, अशी आग्रही मागणी केली होती. २०१९ मध्ये मोघमपणे हद्द मोजण्यात आली. त्यामुळे अजिंठानगर येथील ‘जेएनएनयुआरएम’योजनेतील ‘एसआरएस’चा प्रकल्प रेड झोनमधून बाहेर निघाला. २०१७ मध्ये या प्रकल्पासंदर्भात उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. त्यानुसार २०१९ मध्ये टेन्टेटिव्ह मोजणी झाली. हा प्रकल्प रेडझोनमधून बाहेर आला. परंतु, कृष्णानगर सेक्टर २०, यमुनानगर सेक्टर २१, सेक्टर २२ आणि सेक्टर २३ ची हद्द अद्याप निश्चित नाही.परिणामी, रेड झोनची टांगती तलवार कायम आहे.




“ यमुनानगर, कृष्णानगर भागातील रेड झोनबाबत मोजणी करण्यासाठी तत्कालीन नवनगर विकास प्राधिकरणाच्या सभेमध्ये २०२१ मध्ये ठराव करण्यात आला. राज्य सरकारच्या कार्यक्षेत्रातील या प्राधिकरणाने नागरिकांना प्लॉट दिले. त्या ठिकाणी घरे बांधली आहेत. त्यावर रेडझोन दाखवला असल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी आहे. शासनाने दिलेल्या आणि प्लॅन मजूर करुन बांधलेली घरे रेड झोनबाधित होवू शकत नाहीत. यासाठी अनेक वर्षांपासून आम्ही पाठपुरावा करीत आहोत. वर्क ऑफ डिफेन्स ॲक्ट-१९०३ नुसार रेड झोनची मोजणी होणे आवश्यक आहे. मोजणीसाठी आवश्यक फी महापालिका प्रशासनाने प्राधिकरणाला कळवावी, अशी सूचना विभागीय आयुक्तांनी दिली होती. प्राधिकरण पेठ क्रमांक २० ते २४ मधील वारस नोंद, सदनिका, गाळे, भूखंडाचे हस्तांतरण यामध्ये तांत्रिक अडचणी येत आहेत. त्यासाठी रेडझोनचे सीमांकन करण्याची आवश्यकता आहे. रेड झोन मोजणी आणि मिळकतींचे सर्वेक्षण केल्यानंतर ५०० यार्डपर्यंत रेड झोन कमी करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा करणार आहे.

\- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

### रेड झोन हद्द 500 यार्ड करण्यासाठी बळ मिळणार..!

» रेड झोनची मोजणी झाल्यानंतर पिंपरी-चिंचवड शहरातील रेड झोनची हद्द ५०० यार्ड करावी, यासाठी पाठपुरावा करता येईल. मोजणीमुळे रेड झोन वाढेल, ही नागरिकांच्या डोळ्यांत धुळफेक आहे. पूर्वी संरक्षण विभागाने २ हजार यार्ड रेड झोन जाहीर केला. २०१९ मध्ये मोजणी करुन टेन्टेटिव्ह लाईन आखण्यात आली. १ यार्ड म्हणजे 0.9144 मीटर अंतर असते. प्रशासनाने २ हजार यार्ड म्हणजे मोघमपणे २ हजार मीटर गृहित धरले आहे. वस्तुत: ते अंतर १८२८.८ मीटर इतके आहे. त्याद्वारे सर्वे नंबर टेन्टेटिव्ह रेड झोन प्रभावित केले आहेत. वास्तविक, १८२८.८ मीटरच रेड झोन आहे. त्यामुळे मोजणी निश्चित केल्यास तात्काळ १५७ मीटर क्षेत्र रेड झोन मधून बाहेर जाईल. विशेष म्हणजे, संरक्षण विभागाने २००२ मध्ये २००० यार्डचा रेडझोन लादला आहे. पूर्वी तो ५०० यार्डच होता. त्यामुळे व्यापक जनहिताच्या दृष्टीने रेड झोनची मोजणी झाल्यास केंद्र सरकार, संरक्षण विभागाकडे रेड झोन कमी करण्याबाबत पाठपुरावा करण्यास बळ मिळणार आहे, असा दावाही उत्तम केंदळे यांनी केला आहे.

# भ्रष्टाचाराच्या समर्थनार्थ महावितरण अधिकाऱ्यांकडून दादागिरी! तीव्र निषेध !

## महावितरण कंपनी प्रशासनाने केवळ एका अधिकाऱ्याला निलंबित करून,प्रकरण दाबायचा केलेला हा प्रयत्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

माहिती अधिकारात उजेडात आलेला भ्रष्टाचाराची दखल घेत महावितरण प्रशासनाने तळवडे शाखा अभियंता रमाकांत गर्जे याला निलंबित केले.आता महावितरण कर्मचारी युनियन अशा भ्रष्टाचारी अभियंत्याला समर्थन द्यायला आंदोलन करत असल्याने"कुंपणच शेत खाऊ लागले"असल्याची उक्ती सत्यात उतरताना दिसत आहे.मुळात हे आंदोलन अजून दोन अभियंते जे की स्पष्टपणे या सगळ्या भ्रष्टाचारात सामील आहेत,त्यांना वाचवायला आहे. भ्रष्टाचाराच्या साखळीत सामील त्यातली एक महिला अधिकारी जी महावितरण मधून बेदखल केलेल्या संचालकाला कशी मॅनेज करून आली?हे सगळे उघड असल्याने महावितरणने सगळ्या भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना बडतर्फ करावे अशी मागणी करण्यात आली आहे. महावितरण मध्ये भ्रष्टाचाराने नागरिक त्रस्त आहेत आणि पिंपरी चिंचवड इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन ने सामाजिक कर्तव्य म्हणून तळवडे भागातील भ्रष्टाचार उजागर केला आहे.त्याला सामान्य नागरिकांनी समर्थन दिले असताना महावितरण कर्मचारी जे की भ्रष्टाचाराची साखळी चालवतात,त्यांनी भ्रष्ट अधिकाऱ्याला पाठीशी घालायचे धोरण ठेवले असल्याचे दिसून येत आहे

सामान्य ग्राहकांची लाखोंची लूट अधिकारी करतात आणि त्याच्या विरोधात प्रशासनाने पावले उचलली की लगेच यांच्यातलं भ्रष्टाचाराचे भूत जागे होऊन अशी कारवाई थांबायला भाग पाडतात.मुळात आंदोलन करायला नोटीस द्यावी लागते,जी दिली नसून,यांचा एक दिवसांचा पगार कापून त्याची नोंद सेवा पुस्तिकेत घेतली जाणे गरजेचे असून,अशा मुजोरी विरोधात जनतेने यांना धडा शिकवायची गरज आहे. केवळ एका अधिकाऱ्याला निलंबित करून,प्रकरण दाबायचा केलेला हा प्रयत्न आहे.याउलट प्राधिकरण अतिरिक्त कार्यकारी अभियंता स्नेहलता हंचाटे आणि कनिष्ठ अभियंता विनायक शिंदे यांनीही सेवेतून बडतर्फ करून समाजापुढे आदर्श घालून दिला जाणा गरजेचा आहे.हंचाटे यांची नियुक्ती नियमबाह्य पद्धतीने भ्रष्टाचार करून झाली आहे ज्याची चौकशी होणे गरजेचे आहे. हंचाटे यांनी अनैतिक मार्गाने प्राधिकरण उपविभाग या ठिकाणी बदली करून घेतली असल्याने त्यांनाही सेवेतून बडतर्फ केले जावे.याशिवाय या अधिकाऱ्यांची भ्रष्टाचार विरोधी पथकाकडून चौकशी केली जावी तसेच प्रत्येक अधिकाऱ्याने भ्रष्ट मार्गाने जमा केलेल्या करोडो रुपयांच्या संपत्तीला शासन दरबारी जमा करून घेतले जावे आणि तळवडे प्रकरणात यांच्यावर गुन्हे दाखल केले जाण्याची आवश्यकता आहे. यांच्या सर्व चल आणि अचल संपत्तीला तातडीने नागरिकांमध्ये वितरीत केले जावे जेणेकरून सामाजिक समतोल राखला जाऊ शकेल .



### नवीन वीज जोडणी द्यायला रेट ठरलेले

» १) २० एच पी नवीन वीज जोडणी फाईलला सहायक अभियंता यांचे दर ५ ते ७.५ हजार आहेत.लोड नसल्याचे कारण देत फाईलला २० ते २५ हजार देखील मागितले जातात अशा संघटनेच्या तक्रारी आहेत. २)२० एच पी ते ६५ एच पी साठी २५ हजार रुपये सहायक अभियंता मागणी करतो.त्याच फाईलला मंजुरीचे अधिकार असलेल्या अतिरिक्त कार्यकारी अभियंत्याचे दर ५० हजार रुपये असल्याच्या तक्रारी आहेत. ३)२०० एच पी पर्यंत फाईलला एक ते दीड लाख रुपये मागितले जातात अशा तक्रारी आहे.

# पुण्यातील कोणते पब किती हप्ते देतात...

## रवींद्र धंगेकर, सुषमा अंधारे यांनी सुरु असलेल्या हप्त्यांची यादी वाचून दाखवली

**पुणे | प्रतिनिधी**

काँग्रेस नेते मोहन जोशी, आमदार रवींद्र धंगेकर, शिवसेना उबाठा नेत्या सुषमा अंधारे चांगल्याच आक्रमक झाला. सुमारे तासभर ते पुणे शहरात अवैध सुरु असलेल्या पबसंदर्भात जाब विचारत होते. पबकडून सुरु असलेल्या हप्त्यांची यादी त्यांनी वाचून दाखवली.

पुणे शहरातील पब संस्कृती पोलिसांच्या आशीर्वादामुळे सुरु आहे. या प्रकरणात कोणत्या पबकडून किती हप्ते घेतले जात आहे, त्याची यादी शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे आणि आमदार रवींद्र धंगेकर यांनी माध्यमांसमोर आंदोलन केले. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांसमोर ही हप्त्यांची यादी सुषमा अंधारे आणि रवींद्र धंगेकर यांनी वाचली. त्यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी हे आरोप फेटाळून लावले. परंतु आपल्याकडे व्हिडिओ आहेत, असा दावा दोन्ही नेत्यांनी केला. येत्या ४८ तासांत बेकायदेशीर पबवर कारवाई न झाल्यास पुन्हा



### अधिकाऱ्याचा दावा आरोप चुकीचे

». हप्ते वसुलीचा आरोप चुकीचा आहे, असा दावा राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक चरणसिंह राजपूत यांनी केला. शहरात कुठे बेकायदेशीर बार तर आपण चौकशी करुन कारवाई करणार असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून आठ हजार गुन्हे दाखल झाले आहेत. पब, बार, हॉटेल मालकावर गेल्या वर्षापेक्षा दुप्पट गुन्हे दाखल झाले आहेत. या वर्षी १७ परवाने निलंबित करण्यात आले आहे. वर्षभरात 100 पेक्षा जास्त बारवर कारवाई करण्यात आली आहे. दोन परवाने कायमस्वरुपी बंद केले आहे. पुण्यातील 54 बार सील केले आहेत, असे राजपूत यांनी सांगितले.

### अधिकारी-लोकप्रतिनिधींचा वाद

» राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयात काँग्रेस नेते मोहन जोशी, आमदार रवींद्र धंगेकर, शिवसेना उबाठा नेत्या सुषमा अंधारे चांगल्याच आक्रमक झाला. सुमारे तासभर ते पुणे शहरात अवैध सुरु असलेल्या पबसंदर्भात जाब विचारत होते. शहरात अनेक ठिकाणी बेकायदेशीर पब सुरु आहे. परंतु त्याच्यावर हप्तेवसुलीमुळे कारवाई होत नाही. आमच्याबरोबर चला, आम्ही तुम्हाला बेकायदेशी सुरु असलेले पब दाखवतो, असे त्यांनी म्हटले. तसेच कोणत्या पबकडून महिन्याला किती वसुली होती, त्याची यादी पुन्हा वाचून दाखवली. आपण हप्ते घेतानाचे स्टिंग ऑपरेशन केले आहे त्याचे व्हिडिओ माझ्याकडे आहे. पुणेकरांसाठी तुम्ही कारवाई करा, असे या नेत्यांनी अधिकाऱ्यांना सुनावले.

आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. काँग्रेस नेते मोहन जोशी यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.

सुषमा अंधारे यांनी अबकारी विभागाची अक्षरशः लाज काढत पुण्यामधील कोणत्या हॉटेलमधून, पबमधून किती रुपयांचा हप्ता जातो याची यादीच वाचून दाखवली. काही हजारांपासून ते लाखांपर्यंत ही यादी असल्याचे सुषमा अंधारे यांनी वाचून दाखवलेल्या यादीतून समोर आले. यावेळी शांत उभे राहून ऐकून घेण्याची वेळ विभागाच्या अधिकाऱ्यांवर आली. सुषमा अंधारे आणि रवींद्र धंगेकर यांनी यांनी कार्यालयामध्ये पोहोचत पब संस्कृतीवर एक प्रकारे हातोडा टाकताना कारवाई कधी करणार? अशी विचारणा करत विभागाच्या अधिकाऱ्यांवर प्रश्नांची सरबत्ती केली. अंधारे यांनी माध्यमांच्या कॅमेरांसमोरच पुण्यातून कोणत्या हॉटेलमधून कोणत्या पबमधून किती रुपयांचा हप्ता जातो, याची माहिती दिली.

# रात्री उशिरापर्यंत चालणारे पब, हुक्का पार्लर कायमचे बंद करा

## शिवसेना शहर प्रमुख प्रमोद भानगिरेंचे मुख्यमंत्र्यांना पत्र, पब संस्कृती कायमची बंद व्हावी

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात अल्पवयीन मुलाकडून झालेल्या अपघाताच्या घटनेमुळे शहर सुन्न पडले आहे. रात्री उशिरा पब व बारमधून मद्यधुंद अवस्थेत तरुणाई बाहेर पडते आणि बेधुंदपणे वाहने चालवल्यामुळे असे प्रकार घडतात असे उघडकीस आले आहे. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत चालणारे सर्व अनधिकृत पब व हुक्का पार्लर कायमचे बंद करावेत, अशी मागणी पुण्याचे शिवसेनेचे शहरप्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, पुणे पोलीस आयुक्त, पुणे जिल्हाधिकारी, पुणे विभागीय आयुक्त व पुणे महानगर पालिका आयुक्तांना पत्राद्वारे केली आहे.

पुण्यातल्या कल्याणी नगर भागात एका अल्पवयीन मुलाने पोर्शे या महागड्या कारने दोघांना धडक दिली. यात दोघांचा मृत्यू झाला. दोन



### दोन जणांनी गमावला जीव

» दरम्यान, 8 दिवसांपूर्वी पुण्यातील कल्याणीनगर भागात पोर्शे कारने रात्री एका दुचाकीला धडक दिली होती. यामध्ये दुचाकीवरील तरुण आणि तरुणी जागीच मृत्यू पावले. पोर्शे कार चालवणारा अल्पवयीन मुलगा होता. तो पबमध्ये दारू पिऊन बाहेर पडला होता. या घटनेनंतर पुण्यातील पब संस्कृती चर्चेत आली आहे. त्यानंतर आता ही पब संस्कृती कायमची बंद व्हावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

निरपराधांचा बळी घेतल्यानंतर या अल्पवयीन मुलाला अटक करण्यात आली होती. मात्र अवघ्या १५ तासांमध्ये त्याला जामीन मिळाला. ज्याचे पडसाद सर्व स्तरातून उमटले आहेत. मात्र, जनतेने आवाज उठवल्यामुळे जामीनावर सोडलेल्या बड्या बिल्डरच्या अल्पवयीन मुलाचा जामीन रद्द करण्यात आला आहे. या

### पत्रात काय म्हंटले आहे ?

» “काहीच दिवसांपूर्वी अल्पवयीन तरुणाकडून बेदरकार पद्धतीने वाहन चालवित अपघात केल्यामुळे पुणेकर सुन्न झाले आहेत. याला पुणे शहर व जिल्ह्यातील बेकायदा पद्धतीने रात्री उशिरापर्यंत चालणारे पब, बार व हुक्का पार्लर कारणीभूत असल्याचे निदर्शनास आले आहे. शहरातील तरुणाई मोठ्या संख्येने याला बळी पडत असून मद्यधुंद अवस्थेत पब व बार मधून बाहेर पडतांना अनेक अपघात झाल्याचे समोर आले आहे. पुणे शहर व जिल्ह्याचे समाजिक स्वास्थ्य अबाधित राखण्यासाठी व पुणे शहराचे नावलौकिक शिक्षण, संशोधन व सांस्कृतिक राजधानी हाच असावा, याकरिता शहरातील तरुणाईला व्यसनाधीनतेच्या विळख्यात टाकणाऱ्या या पब व हुक्का पार्लर संस्कृतीला तातडीने पायबंद घालणे अत्यंत आवश्यक आहे. पुणे शहरात भान हरवून वावरणाऱ्या दिशाहीन तरुण पिढीला शिस्त लागावी व शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी रात्री उशिरापर्यंत चालणारे पब व हुक्का पार्लर कायमचे बंद करावी अशी मागणी या पत्रात करण्यात आली आहे.

प्रकरणी अल्पवयीन मुलाचे वडील, कोझी व ब्लॅक पबचे मालक आणि कर्मचारी यांची शुक्रवारी (ता.२४) न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. न्यायालयाने आरोपींना 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. पुण्यातील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांचा अल्पवयीन मुलगा वेदांत अग्रवाल याने दोन आयटी अभियंत्यांना अडीच कोटी रुपयांच्या पोर्शे कारने उडवले. या अपघातात दोघांनाही जागीच जीव गमवावा लागला होता.

# ‘निकाल’ लोकसभेचा; ‘परीक्षा’ पालिकेची!

## बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे लोकसभा निवडणूक शहरासाठी चर्चेचा विषय ठरली

**पिंपरी | प्रतिनिधी**

बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे लोकसभा निवडणूक शहरासाठी चर्चेचा विषय ठरली. अनेक परंपरागत विरोधक एकाच व्यासपीठावर आढळले. पण, ते मनापासून एकत्र होते, की केवळ पक्षश्रेष्ठींच्या निर्णयामुळे तनाने उपस्थित राहायचे. खरोखरच त्यांनी ‘आपल्या’ उमेदवाराचे काम केले, की ‘काम’ दाखवले, हे चार जूनला मतमोजणीनंतर अर्थात लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतरच कळणार आहे.

मात्र, त्याचा परिणाम आगामी वर्षभरात येऊ घातलेल्या विधानसभेपेक्षाही महापालिका निवडणुकीतील समीकरणांवर होऊ शकतो. कारण कोणत्या मतदान केंद्रावर आपल्या उमेदवाराला किती मते मिळाली, या कामगिरीवरच अनेकांची महापालिकेची उमेदवारी ठरणार, ही सद्यःस्थिती आहे.

आगामी काळात महायुती वा महाविकास आघाडी टिकून राहिल्यास वा बिनसल्यास महापालिका उमेदवारीची राजकीय रंगत आणखी वाढणार व उमेदवारी देण्याबाबत गुंतागुंतीची होणार, यात शंका नाही.

महापालिकेतील लोकनियुक्त प्रतिनिधींची मुदत १३ मार्च २०२२ रोजी संपली आहे. त्यापूर्वी निवडणूक होऊन १४ मार्चपासून नवीन कारभारी महापालिकेत कार्यरत असायला हवे होते. मात्र, कोरोना प्रतिबंधक नियम, राज्यातील बदलत्या राजकीय घडामोडी, मराठा व ओबीसी आरक्षणाचा न्यायप्रविष्ट मुद्दा, अशा विविध कारणांमुळे महापालिका निवडणूक लांबणीवर पडली आहे. ती आता फेब्रुवारी २०२५ मध्ये होण्याची शक्यता आहे.

ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ मध्ये मुदत संपणार असल्याने विधानसभा निवडणूक अपेक्षित आहे. त्या अगोदर जून ते सप्टेंबर, पावसाळा असल्याने निवडणूक होणे अशक्य आहे.



### संभाव्य राजकीय पेच आणि समीकरणे

» महापालिकेची आगामी निवडणूक महायुती वा महाविकास आघाडी अशी लढली गेल्यास नगरसेवकपदाची उमेदवारी मिळविण्यासाठी स्पर्धा तीव्र होणार,बदलत्या राजकीय समीकरणात लोकसभा निवडणुकीत शहरातील कोणत्या मतदान केंद्रावर ‘आपल्या’ (महायुती किंवा महाविकास आघाडी) उमेदवाराला किती मताधिक्य मिळाले, याचा विचार केला जाणार.गेल्या वेळी कोण नगरसेवक होते, त्याची कामगिरी कशी होती? यावरही विचार होऊ शकतो, अशी कुजबूज ऐकायला येत आहे. महापालिकेच्या २०१७ च्या निवडणुकीत भाजप विजयी झालेल्या ७७ जागांवर राष्ट्रवादी काँग्रेसचे ५३, शिवसेनेचे १८, काँग्रेसचे दोन व अपक्ष चार उमेदवार द्वितीय स्थानी होते.

### मार्च 2022 नंतरची स्थिती

» शिवसेनेपाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली होती. शिवसेना व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष असे पक्ष निर्माण झाले. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसने भाजपला साथ दिली आणि महायुती अस्तित्वात आली आहे, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हे काँग्रेससोबत एकत्र येऊन महाविकास आघाडी झाली आहे. लोकसभेची निवडणूक महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशीच लढली गेली. शरद पवार यांच्याऐवजी अजित पवार यांचे नेतृत्व स्वीकारलेल्या व निवडणुकीपूर्वी ठाकरे यांच्या गोटात शिरलेल्या माजी महापौराला महाविकास आघाडीकडून उमेदवारी मिळाली. त्यांच्या प्रचारात शरद पवार समर्थक दिसले. त्यांचे राजकीय विरोधक असलेल्या भाजपच्या एका ज्येष्ठ नगरसेवकानेही ठाकरे यांचे नेतृत्व स्वीकारले आहे. तेही गळ्यात गळे घालून प्रचारात दिसले.

# अवजड वाहनांवर पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेकडून कारवाई

## वाहतूक शाखेने आयुक्तालयाच्या हद्दीतील विविध मार्गांवर अवजड वाहनांना प्रवेशास मनाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातून सकाळी व सायंकाळी ठराविक वेळेत जड अवजड वाहनांना प्रवासास मनाई असतानाही ही वाहने वर्दळीच्या रस्त्यावर धावत असतात. यामुळे वाहतूक कोंडी होण्यासह अपघाताच्या घटना घडतात. रस्त्यालगत उभ्या केलेल्या वाहनांमुळेही अपघाताचा धोका निर्माण होतो,

अशा वाहनांवर पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या वाहतूक शाखेकडून कारवाई केली जात असून, चार महिन्यांत १७ हजार २३९ वाहनांवर कारवाई करून तब्बल दोन कोटी रुपयांचा दंड वसूल केला आहे. वाहतूक पोलिसांकडून कारवाईचा धडाका सुरू असताना तरी या वाहनचालकांना वाहतूक नियमांचे ‘वजन’ पेलणार की? नेहमीप्रमाणे नियम पायदळी तुडवून सुसाट धावतच राहणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. वाहतूक शाखेने आयुक्तालयाच्या हद्दीतील विविध मार्गांवर सकाळी व सायंकाळी ठराविक वेळेत मोठे ट्रक, ट्रेलर, कंटेनर अशा अवजड वाहनांना प्रवेशास मनाई केली आहे.

तरीही संबंधित वाहनचालक यामार्गावरुन सुसाट निघतात. त्यामुळे अशा वाहनांना इतर वाहने धडकूनही अपघाताच्या घटना घडतात. त्यामुळे पोलिसांनी रस्त्यालगतच्या वाहनांवरही मोठ्या प्रमाणात कारवाई केली.

अशा बेशिस्त चालकांना वठणीवर आणण्यासाठी वाहतूक शाखेने कारवाईची मोहीम राबवली. विविध वाहतूक विभागांतर्गत एक जानेवारी ते ३० एप्रिल २०२४ या कालावधीत १७ हजार २३९ वाहन चालकांवर कारवाई केली. यामध्ये सर्वाधिक कारवाई वाकड विभागाने केली. दरम्यान, अशा कारवायांमुळे तरी बेशिस्त चालकांना जरब बसेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



> अवजड वाहनांना ठराविक वेळेत शहरातून प्रवासास मनाई आहे. तरीही ही वाहने शहरातून धावतात. त्यामुळे अशा अवजड वाहनांवर कारवाईची मोहीम राबवली जात आहे. ही कारवाई यापुढेही सुरूच राहणार आहे. वाहनचालकांनी नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.
>
> \- विशाल गायकवाड, पोलिस उपायुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड

### रस्त्यालगतची अवजड वाहने ठरताहेत धोकादायक

» मुंबई-पुणे महामार्ग, मुंबई-बंगळूर महामार्ग, चाकण-तळेगाव मार्ग यासह इतरही मार्गालगत अनेक चालक त्यांची वाहने उभी करतात. इंडिकेटर, पार्किंग लाइट सुरू नसल्यास ही वाहने रात्री नजरेस पडत नाहीत. त्यामुळे अशा वाहनांना इतर वाहने धडकूनही अपघाताच्या घटना घडतात. त्यामुळे पोलिसांनी रस्त्यालगतच्या वाहनांवरही मोठ्या प्रमाणात कारवाई केली.

# अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे पुणेकरांचा घसा कोरडा

## उन्हाचा चटका वाढत असल्याने नागरिक हैराण, यंदा टँकरच्या फेऱ्या वाढल्या

**पुणे | प्रतिनिधी**

एकीकडे उन्हाचा चटका वाढत असल्याने नागरिक हैराण आहेत, तर दुसऱ्या बाजूला अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे भर उन्हाळ्यात नागरिकांचे हाल होत आहेत. महापालिकेचा टँकर मागविला तरी पुरेसे पाणी मिळत नाही. त्यामुळे नाइलाजास्तव हजार-बाराशे रुपये खर्च करून खासगी टँकर मागवावा लागत आहे.

त्यामुळे मध्यवर्ती भागांसह उपनगरांमधील नागरिक हैराण झाले आहेत. धक्कादायक म्हणजे गेल्या वर्षीच्या एप्रिल महिन्याच्या तुलनेत यंदा महापालिकेच्या टँकरच्या फेऱ्या आठ हजारांनी वाढल्याने पाणीटंचाईची तीव्रता स्पष्ट होत आहे.

पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण प्रकल्पात यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे अडीच टीएमसी पाणीसाठा कमी आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा काळजीपूर्वक वापर करणे आवश्यक आहे. पाटबंधारे विभाग, महापालिकेची संयुक्त बैठक झाली, पत्रव्यवहारांमध्येही पाणी बचतीसंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर पाण्यावरून आरडाओरड होऊ नये, यासाठी पाणी कपातीबाबत कोणताही निर्णय घेतला नाही. मात्र, असमान पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

एकीकडे उन्हाचा चटका वाढत असल्याने नागरिक हैराण आहेत, तर दुसऱ्या बाजूला अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे भर उन्हाळ्यात नागरिकांचे हाल होत आहेत. महापालिकेकडून जागोजागी ठेवण्यात आलेल्या बॅरलमध्ये टँकरद्वारे पाणी टाकण्यात येते. पण कमी पाणी टाकले जात असल्याने पाणी पुरत नाही. पाणी घेण्यासाठी गर्दी होते, त्यातून वाद होत आहेत. त्यामुळे आम्हाला आता पदरमोड करून खासगी टँकर मागवावे लागत आहेत. लोकसंख्येचा विचार करून महापालिकेने टँकरची संख्या वाढवली पाहिजे.



“ जुन्या हद्दीत समान पाणीपुरवठा योजनेचे काम चालू आहे. या योजनेचे काम पूर्णत्वास जात असून त्यानंतर पाण्याचे प्रश्न कमी होतील. समाविष्ट गावांमध्ये सूस, म्हाळुंगे, पाषाण आणि सासवड रोड येथे नवीन टँकर पॉइंट चालू करत आहोत. त्यामुळे टँकरच्या प्रवासाचा खर्च कमी होईल आणि खेपा वाढणार असल्याने जास्त पाणी मिळेल. मांजरी शेवाळवाडीतील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्पाचे काम लवकरच पूर्ण होत आहे. तेथील काम पूर्ण झाल्यानंतर त्या भागातील टँकर कमी होतील आणि हे टँकर ज्या भागात पाणीटंचाई तीव्र असलेल्या ठिकाणी फिरवले जातील.

\- नंदकिशोर जगताप, प्रमुख, पाणीपुरवठा विभाग

### महापालिकेकडून होणारा पाणीपुरवठा अपुरा

» समाविष्ट झालेल्या ३४ गावांमध्ये पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेने टँकर पुरविण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी फुरसुंगी, उरुळी देवाची, बावधन, सूस, आंबेगाव, मांगडेवाडी, गुजर निंबाळकरवाडी आदी भागात टँकरने पाणीपुरवठा केला जातो. मात्र, हा पाणीपुरवठा अपुरा आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना पुन्हा खासगी टँकर मागवून तहान भागवावी लागत आहे. बाणेर, बालेवाडी, धायरी, आंबेगाव, नऱ्हे, किरकटवाडी, कात्रज, बिबवेवाडी, महंमदवाडी, एनआयबीएम, उंड्री, पिसोळी, मांगडेवाडी, येरवडा, कोथरूड, कर्वेनगर, वारजे, बावधन, पाषाण, औंध, बोपोडी, वडगाव शेरी, टिंगरेनगर, डेक्कन जिमखाना, कोंढवा गोखलेनगर आदी भागांत पाणीटंचाई भासत आहे. कमी वेळ, कमी दाबाने पाणी येण्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. महापालिकेकडे तक्रार केल्यानंतर एक-दोन दिवस पाणी व्यवस्थित येते. मात्र, पुन्हा पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.

# अपघातातील अल्पवयीन मुलाच्या रक्ताच्या नमुन्यात फेरफार

## अल्कोहोल न घेतलेल्या व्यक्तीचे नमुने अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने म्हणून दाखवले

**पुणे | प्रतिनिधी**

अपघाताला जबाबदार असलेल्या असलेल्या अल्पवयीन मुलाने मद्यप्राशन केलं आहे हे तपासण्यासाठी हे रक्ताचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले होते. यावेळी अल्कोहोल न घेतलेल्या व्यक्तीचे नमुने अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने म्हणून दाखवण्यात आले.

पुण्यातील कल्याणीनगर परिसरात १९ मे रोजी एका पोर्श गाडीने बेदरकारपणे एका दुचाकीला उडवलं. त्यामुळे या दुचाकीवर असलेल्या दोघांचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात घडला त्याचदिवशी सकाळी ११ वाजता ससून रुग्णालयातील फॉरेन्सिक विभागात त्याच्या रक्ताचे नमुने तपासणीसाठी नेण्यात आले होते. या तपासणीत फेरफार केल्याप्रकरणी दोन डॉक्टरांना अटक करण्यात आली आहे. पुणे पोर्श क्रॅश प्रकरण सुरुवातीपासूनच वादात सापडले आहे. ज्यामध्ये आरोपीच्या कुटुंबाला प्राधान्य देणे आणि अंडरवर्ल्ड कनेक्शनचा आरोप आहे.

अपघाताला जबाबदार असलेल्या असलेल्या अल्पवयीन मुलाने मद्यप्राशन केलं आहे हे तपासण्यासाठी हे रक्ताचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले होते. यावेळी अल्कोहोल न घेतलेल्या व्यक्तीचे नमुने अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने म्हणून दाखवण्यात आले. परिणामी अहवालात त्याच्या शरीरात अल्कोहोल नसल्याचं सिद्ध झालं. त्यामुळे पोलिसांना संशय आला. त्याच्या रक्ताची पुन्हा तपासणी करण्यात आली. दुसऱ्यांदा झालेल्या चाचणीत त्याच्या शरीरात अल्कोहोल आढळलं. तसंच, डीएनए चाचणीत दोन्ही चाचण्यातील रक्त नमुने वेगवेगळे असल्याचं सिद्ध झालं. त्यामुळे आरोपी अल्पवयीन मुलाचे संरक्षण करण्यासाठी सरकारी रुग्णालयातील डॉक्टरांनी पुराव्यांशी छेडछाड केली असल्याचा संशय तपासकर्त्यांना आला.



### आमदार रवींद्र धंगेकर यांनीही संताप व्यक्त

» या प्रकरणानंतर पुण्याचे आमदार रवींद्र धंगेकर यांनीही संताप व्यक्त केला आहे. “त्या रात्री अनेकांनी ईमान विकले”, असं ते म्हणाले. “याच ससूनमध्ये मयत अश्विनी कोस्टा यांच्या नातेवाईकांनी मृतदेह अजून अर्धा तास शवगृहात ठेवा आमची अँब्युलन्स येत आहे, अशी विनंती केली होती. मात्र रुग्णालय प्रशासनाने अर्धा तास वाढवून द्यायला देखील नकार दिला होता”, असंही ते म्हणाले..

### डॉक्टरांची चौकशी सुरू

» डॉ. अजय तावरे आणि डॉ. श्रीहरी हरलोर असं या डॉक्टरांची नावं असून पुणे गुन्हे शाखेकडून त्यांचा चौकशी केली जात आहे. डॉ. तावरे हे ससूनच्या फोरेन्सिक विभागाचे प्रमुख आहेत. या दोन्ही डॉक्टरांचे फोन ताब्यात घेण्यात आले आहेत. अपघातानंतर अल्पवयीन मुलाच्या वडिलांनी डॉ. तावरे यांना फोन केला होता, असं पोलिसांनी म्हटलं आहे.